REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २३ नोव्हेंबर, १९४९ | अंक ४५


## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षात ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरीः–५५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखाः–( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेरगांवच्या शाखाः– (१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

## वांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल जि. कुलाबा.

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,२५० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४७,००० |
| खेळतें भांडवल | रु. ६३,००,००० |

**शाखा**

मुंबईः–६५।६७ झव्हेरी बझार.
पुणेंः–१२६८ भवानी पेठ.
अहमदनगरः–बझार पेठ.
बेलापूररोडः–पोस्टासमोर,
कल्याणः–शिवाजी चौक.
भिवंडीः–बझार पेठ.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास वांठिया-अध्यक्ष.
" " केशरचंद आनंदराम वांठिया.
" " खिवराज आनंदराम वांठिया.
" " विरदीचंद भूरचंद वांठिया-मॅ.डायरेक्टर.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.)

श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवाला ( सेंट्रल ऑटो सर्व्हिस )
" ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी अहमदनगर.

श्री. रा. गणेश भैरव साठे, जनरल मॅनेजर.

★ *बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात.* ★

*विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

श्री. आर. पी. जोशी, B. A., Cert. A. I. I. B.
मॅनेजर.

## कैसाच्या सौंदर्याकरितां–

## पंढरिनाथ ब्रिलियन्टाईन वापरा.

तयार कपड्यांचे व्यापारी | **महिंद्रकर ब्रदर्स** | बुधवार चौक, पुणें

पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**पाकिस्तानचा गहूं आणि अवमूल्यन**— पाकिस्तानच्या शेतकी खात्याच्या चिटणिसांनीं अशी माहिती सांगितली कीं, १९५२ सालच्या सुमारास पाकिस्तानांत निर्यात करण्याइतकें अन्नधान्य निर्माण होईल. पाकिस्तान हिंदुस्थानला १,७५,००० टन गहूं देण्यास कराराप्रमाणें तयार होता. परंतु रुपयाच्या अवमूल्यनामुळें हिंदुस्थानला तो घेतां आला नाहीं.

**अमेरिकेंत मोटारींचें प्रचंड उत्पादन**—डेट्रॉइट येथील कारखान्यांतून ५३,५८,४२१ वी मोटार नुकतीच बाहेर पडली. अमेरिकेच्या वार्षिक मोटार उत्पादनाचा हा सर्वांत अधिक आकडा आहे. ह्या उत्पादनापैकीं ४५,००,००० मोटारी उतारूंची वहातूक करणाऱ्या आहेत.

**पाकिस्तानांत साखरेचा कारखाना**—वायव्य सरहद्द प्रांतांत मार्दान येथें आशिया खंडांतील सर्वांत मोठा साखरेचा कारखाना उभारला जात आहे. ह्या कारखान्याच्या यंत्र-सामुग्रीचें वजन ४५ हजार टन आहे, आणि ती डर्बी येथील एका ब्रिटिश कंपनीनें पुरविलेली आहे. कारखान्यांतून फेब्रुवारी १९५० च्या सुमाराला साखर तयार होऊं लागेल. वार्षिक उत्पादन सुमारें ५०,००० टन होईल. त्या शिवाय उसाच्या रसाच्या मळीपासून पॉवर अल्कोहलहि तयार करण्यांत येणार आहे.

**आयात निर्बंधांचा परिणाम**—हिंद सरकारनें सप्टेंबर महिन्यांत सुलभ आणि दुर्लभ चलनांच्या देशांतून आयात होणाऱ्या मालावर निर्बंध जाहीर केले. त्यामुळें परदेशांतील मालाच्या हिंदी वृत्तपत्रांतील जाहिराती कमी झाल्या आहेत. १९५० सालीं निर्बंध अधिकच वाढण्याचा संभव असल्यानें परकीय जाहिरातदार आपला जाहिरातींवरील खर्च ४० टक्क्यांनीं तरी कमी करतील, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**साखरेचें उत्पादन वाढावें म्हणून**—हिंदमधील साखरेचें उत्पादन वाढविण्यास उत्तेजन मिळावें म्हणून सरकारनें दर मणावर ९ आणे ह्या कमी दरानें जकात आकारण्याचें जाहीर केलें आहे. ज्या कारखान्यांचें साखरेचें उत्पादन १९४९–५० च्या हंगामांत १९४८–४९ च्या हंगामापेक्षा ५ टक्क्यापेक्षा अधिक होईल, त्यांना ह्या अधिक झालेल्या उत्पादनावरील जकातीची रक्कम वरील हिशेबानें परत मिळणार आहे.

**हिंदी प्रवाशांनी परदेशीं किती पैसे न्यावेत ?**—हिंदी प्रवाशांनीं परदेशांत खर्चासाठी नेण्याच्या रकमेंत हिंद सरकारनें कपात केली आहे असें समजतें. इंग्लंड आणि इतर सुलभ चलनाच्या देशांत तीन महिन्यांसाठी ४५० पौंड, तीन वर्षांच्या काळांत, एकदांच नेता येतील. पूर्वी ही रक्कम ८०० पौंड होती. स्विटझरलंड, बेल्जम, इत्यादी देशांत जाणाऱ्या प्रवाशांना ५० पौंड नेता येतील.

**पाकिस्तानसाठी अमेरिकन पोलाद**—पाकिस्तानची पोलादाची गरज आणि त्या देशांत पोलाद निर्माण करण्याची शक्यता ह्यासंबंधीं पहाणी करण्यासाठीं अमेरिकन पोलादवाल्यांचें एक मंडळ लौकरच पाकिस्तानांत जाणार आहे. ह्या मंडळाला कांहीं अमेरिकन बँकांचा पाठिंबा आहे असें समजतें. पाकिस्ताननें मागणी केल्यास पोलाद पुरविण्याची व्यवस्था हें मंडळ करणार आहे.

**बँका व विमाकंपन्यांमधील औद्योगिक तंटे**– ज्या बँकांच्या अगर विमा कंपन्यांच्या एकाहून अधिक प्रांतांत शाखा आहेत, त्यांच्यांत उद्‌भवलेल्या औद्योगिक तंट्यासंबंधीं ग. जनरलनीं एक वटहुकूम काढला आहे. ह्या वटहुकुमान्वयें अशा तंट्यांची दखलगिरी घेण्याचें काम प्रांतिक सरकारांच्या औद्योगिक कोर्टाकडून काढून घेण्यांत आलें आहे. हे तंटे मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या ट्रायब्यूनलकडेच सोपविण्यांत आले पाहिजेत.

**पूर्व आफ्रिकेंतील भुईमुगाची लागवड**—पूर्व अफ्रिकेंत ओव्हरसीज फूड कॉर्पोरेशन ह्या संघटनेतर्फे भुईमुगाची लागवड करण्याची मोहीम ब्रिटिश सरकारनें अंगावर घेतली होती. ह्या मोहिमेच्या पहिल्या वर्षाच्या कार्यासंबंधीं हिशेबतपासनीसांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ह्या मोहिमेंत उत्पादनाच्या मानानें खर्चच अधिक झाल्याचें आढळून आलें आहे. भुईमुगाच्या लागवडीची मूळ कल्पना ज्या कंपनीनें काढली, तिच्या अंदाजाप्रमाणें २५,००,००० एकर जमीन लागवडीसाठी यावयास पाहिजे होती आणि ४,००,००० टन भुईमूग अगर १,६०,००० टन तेल दरवर्षी उत्पन्न व्हावयास पाहिजे होतें. १९४८ सालीं कॉर्पोरेशननें ही योजना आपल्याकडे घेतल्यापासून फक्त २,१५० टन भुइमूगच निर्माण झाला.

**ब्रिटनच्या सिनेमाच्या धंद्यावर संकट**—ब्रिटनमधील सिनेमाच्या धंद्यापैकीं जवळ जवळ तीन चतुर्थांश विभागावर नियंत्रण ठेवणारे मि. रँक ह्यांनीं आपल्या भागीदारांना धक्का देणारें वृत्त नुकतेंच जाहीर केलें. २५, जून १९४९ रोजीं संपलेल्या वर्षांत मि. रँक ह्यांच्या कंपन्यांना ३३,५०,००० पौंड नुकसान सोसावें लागून १,६३,००,००० पौंड बँकांचें देणें झालें, असें त्यांनीं सांगितलें. ह्या धंद्यावरील कराची जबर आकारणी अशीच चालू राहिल्यास ब्रिटिश चित्रपटगृहांतून बहुतेक सर्व अमेरिकन चित्रपट दाखविण्यास सुरवात होईल अशी भीति ब्रिटिश वृत्तपत्रांनीं व्यक्त केली आहे.

**रशिआचा सोन्याचा सांठा**—रशिआनें आपल्याजवळील सोन्याच्या सांठ्याचा उपयोग करून रूबल-गट स्थापन करण्याचें ठरविलें आहे असें कळतें. रशिआंत सध्या सोन्याच्या २०० खाणी असून, जगांतील सोन्याच्या उत्पादनांत रशिआ पहिलाच नसला तरी दुसरा खास आहे. रशिआचा सोन्याचा सांठा अमेरिकेच्या खालोखाल आहे. रशिआंतील रहाणीचें मान पश्चिमेकडील राष्ट्रांच्या बरोबरीचें झालें म्हणजे रशिआ आपली सरहद्द खुली करील असाही अंदाज करण्यांत आला आहे.

**भारतासाठीं अर्जेंटायनाचा गहूं**—हिंद सरकारनें अर्जेंटायनाच्या सरकारशीं एक व्यापारी करार केला आहे असें समजतें. कराराच्या अटींप्रमाणें ५०,००० टनाच्या तागाच्या वस्तू देऊन त्यांच्या बदला ३,५०,००० टन गहूं हिंद सरकार आयात करणार आहे. पं. नेहरू अमेरिकेला जाण्यापूर्वी रशियाशींही गव्हाबाबत बोलणीं चालू होतीं. परंतु रशिअन सरकारनें गव्हाच्या किंमती एकदम वाढविल्या व त्यामुळें हिंदला तो गहूं घेणें परवडलें नाहीं अशी वार्ता आहे.

# अर्थ

बुधवार, तां. २३ नोव्हेंबर, १९४९.



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## स्टर्लिंग-गटाची डॉलर-तूट व हिंदचा व्यापार

युरोपच्या आर्थिक कमिशननें आपल्या आर्थिक पत्रकांत स्टर्लिंग-गटाच्या देशांची डॉलर्स व सोनें या बाबतींत माहिती दिली आहे. त्या माहितीचा मुख्य आशय पुढें दिला आहे. स्टर्लिंग गटांतील हिंद, पाकिस्तान, मलाया व दक्षिण आफ्रिका या देशांच्या व्यापारी परिस्थितीमुळें आजचा डॉलर्सचा दुष्काळ प्रामुख्यानें निर्माण झाला आहे. १९३८ ते १९४८ च्या दरम्यान व्यापारी उलाढालीमुळें ग्रेट ब्रिटनच्या व्यवहारामुळें ७ कोटी, ७० लक्ष डॉलर्सची तूट आली, तर बाकीच्या स्टर्लिंग गटांतील देशांमुळें याच काळांत २७ कोटी, ८० लक्ष डालर्स इतकी तूट आली. ब्रिटन व्यतिरिक्त इतर देशांनीं १९३८ ते १९४८ च्या दरम्यान अमेरिका व कॅनडा ह्या देशांतून मालाची खरेदी जास्त प्रमाणांत केली. परंतु ग्रेट ब्रिटननें मात्र १९३८ च्या मानानें अमेरिकेंतून १९४८ सालीं खरेदी फक्त ६० टक्केच केली. ऑस्ट्रेलिया, आयर व न्यूझीलंड यांनींहि डॉलर मालाची खरेदी बऱ्याच कमी प्रमाणांत केली. मलाया, सीलोन, ब्रह्मदेश ह्या देशांनीं अमेरिकन मालाची आयात १९३८ पासूनच्या दहा वर्षांत फार मोठ्या प्रमाणांत केल्यामुळें डॉलर्सचा दुष्काळ तीव्रतेनें जाणवूं लागला. याच काळांत ग्रेट ब्रिटननें स्टर्लिंग कर्जाच्या परत फेडीसाठी रोख किंमत न घेतांना पुष्कळसा माल हिंदुस्थान, सीलोन, इजिप्त इत्यादि देशांना पुरवला. ग्रेट ब्रिटननें विशेषतः आर्थिक पुनर्घटनेला आवश्यक असा भांडवली माल पुरविल्यामुळें युद्धानंतरच्या नाजुक परिस्थितींत ग्रेट ब्रिटनच्या अर्थ व्यवस्थेवर जास्तच ताण पडला. स्वतःच्या परराष्ट्रीय व्यापारासाठी हुंडणावळीची तरतूद करणें, व प्रत्यक्ष मोबदला घेतां (तर स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीसाठी) भांडवली माल आशियांतील राष्ट्रांना पुरवावा लागल्यामुळें ग्रेट ब्रिटनची परिस्थिति जास्तच बिकट होत गेली. परंतु नेटानें उत्पादन वाढवून ब्रिटननें त्या परिस्थितीला तोंड दिलें.

ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्टर्लिंग गटांतील देशांनीं मालाची आयात अमेरिका व इतर डॉलर देशांतून न करतां, विशेषतः स्टर्लिंग गटांतील देशांतूनच करावी. पौंडाची किंमत कमी केल्यामुळें ग्रेट ब्रिटनला व स्टर्लिंग गटांतील देशांना (अर्थात ज्यांनीं पौंडाप्रमाणेंच आपल्या चलनाची किंमत कमी केली आहे अशांना) अमेरिकेकडे निर्गत वाढवितां येईल. सध्यांच्या परिस्थितीचा ग्रेट ब्रिटनला जास्तींत जास्त फायदा मिळवावयाचा असेल तर ब्रिटननें स्टर्लिंग कर्जाच्या परतफेडीसाठी माल पुरविण्याच्या पद्धतीला आळा घातला पाहिजे. याचा सरळ अर्थ असा कीं, गेलीं तीन वर्षें ज्या प्रमाणांत ब्रिटननें हिंदच्या स्टर्लिंग कर्जाची परतफेड केली त्या प्रमाणांत ती यापुढें करीत राहाणें ब्रिटनला परवडणार नाहीं. सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांनीं थोडे दिवसांपूर्वी ब्रिटनला पूर्वीप्रमाणें स्टर्लिंग कर्जाची परतफेड करतां येणार नाहीं हें जाहीर केलें आहेच. यावरून हिंद सरकारला योग्य तो बोध घेतां येईलच. गेलीं तीन वर्षें आपला परराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणांत तुटीचा झाला आहे. स्टर्लिंग कर्ज व आंतरराष्ट्रीय चलननिधींतून काढलेलें तात्पुरतें कर्ज यांतून ही तूट कशी तरी भरून काढली जात होती. यापुढें परिस्थिति जास्त बिकट होत जाणार.

---

## ताडीपासून गूळ तयार करण्याचा धंदा

हिंदुस्थान सरकारला, ताडीपासून गूळ तयार करण्याबद्दल सल्ला-मसलत देणारे श्री. गजाननराव नाईक, ह्यांनीं ह्या धंद्यासंबंधीं मलबार इकॉनॉमिक डेव्हलपमेंट बोर्डापुढें कांहीं उपयुक्त माहिती सांगितली. श्री. गजाननराव नाईक म्हणाले कीं प्रयोगांतीं असें सिद्ध झालें आहे कीं, साखरेच्या कारखान्यांतून तयार झालेल्या साखरेपेक्षां ताडीपासून केलेला गूळ आरोग्य दृष्ट्या अधिक श्रेष्ठ दर्जाचा असतो. ह्या गूळांत कॅलशिअम आणि इतर क्षार असतात. साखर तयार करतांना हे बहुमोल क्षार बऱ्याच प्रमाणांत कमी होतात. ताडीपासून साखर तयार करण्याचा धंदा ग्रामोद्योग म्हणून फारसा करण्यासारखा नाहीं. ताडीच्या गुळापासून रुचकर अशी पांढरी साखर तयार करता येईल. पण ती कारखान्यांतील साखरेशी स्पर्धा करूं शकणार नाहीं. इतकेंच काय, पण परदेशी साखरेशींही हिंदी कारखान्यांतील साखरहि स्पर्धा करूं शकणार नाहीं. साखरेच्या धंद्याला दिलेल्या संरक्षणामुळें साखरेच्या ग्राहकांना आजपर्यंत ९० कोटी रुपये जादा द्यावे लागले आहेत. ताडीपासून गूळ करण्याचा धंदा हिंदुस्थानांत फार प्राचीन कालापासून चालत आला आहे. इतकेंच काय पण एक काळ असा होता कीं, हा गूळ युरोपच्या बाजारपेठेंत निर्यात करण्यांत येत असे.

हिंदुस्थानांत ताडीचीं झाडें विपुल आहेत. त्यांचीं संख्या सुमारें ५ कोटी असावी. तथापि ह्या धंद्यानें फारशी प्रगति केलेली नाहीं. दारूबंदीच्या धोरणामुळें ताडीच्या गुळाचा धंदा बसला हें म्हणणें खरें नाहीं. कारण, दारूबंदी नव्हती तेव्हां सुद्धा फारच थोड्या झाडांच्या ताडीचा गूळ करण्यासाठी उपयोग करण्यांत येत होता. ह्या धंद्याचा विस्तार न होण्याचें कारण वेगळेंच आहे. ताडीपासून गूळ तयार करण्याचा व्यवसाय फक्त हरिजनच करीत आहेत. हरिजनांनीं तयार केलेला गूळ सवर्ण हिंदू वापरीत नाहींत. त्यामुळें धंदा वाढीस लागत नाहीं. शिवाय सध्या ज्या पद्धतीनें गूळ तयार करण्यांत येतो ती फार सदोष आहे. ह्या पद्धतीनें तयार केलेला गूळ काळा आणि बेचव असतो. ताडीच्या झाडावर चढण्या-उतरण्याचें काम दगदगीचें असल्यानें एक माणूस फार झाडांवर चढूं शकत नाहीं. ही दगदग वाचविण्यासाठी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर जाण्यासाठी दोरखंडांचे पूल बांधण्यांत आले तर बरेच श्रम वाचतील. एक दोर चालण्यासाठी आणि दुसरा हातानें धरण्यासाठी, असे दोनच दोर ह्या पुलाला लागतात. असे पूल सीलोनमध्यें मोठ्या प्रमाणावर वापरण्यांत येतात; तसे ते हिंदुस्थानांतही उपयोगांत आणणें शक्य आहे. ह्या धंद्यांत श्रम वांचविणाऱ्या युक्त्या अंमलांत आणल्या व गुळाचा दर्जा वाढविला तर हल्लींपेक्षा बराच अधिक गूळ तयार करून तो बाजारपेठेंत आणता येईल.

---

## कंपनी कायद्यांत नियोजित दुरुस्ती

( ३ )

### प्रॉस्पेक्टसवजा जाहिराती

प्रॉस्पेक्टस म्हणजे कंपनीचे शेअर्स किंवा डिबेंचर्स घेण्याची जनतेला विनंति; त्यांत व्यापारी जाहिरातीचा (जिचेवर "प्रॉस्पेक्टस तयार करून स्वतंत्रपणें फाइल केला आहे" असें स्पष्ट नमूद केलेलें असतें) समावेश होत नाहीं. "हा प्रॉस्पेक्टस नाहीं; केवळ प्रसिद्धीकरण आहे." अशा शीर्षकाखालील जाहिरातींतून, कायद्यास बगल देऊन, शेअर्सची व डिबेंचर्सची विक्री करणारा मजकूर येत असतो. त्यांत, कंपनीला अनुकूल व जनतेला आकर्षक तेवढाच प्रॉस्पेक्टसमधील भाग देण्यांत येतो. सरकारची सूचना अशी:—(१) अशा तऱ्हेच्या जाहिरातींस बंदी असावी. (२) ज्या डायरेक्टरांचे नांवानें ह्या जाहिराती येतात, त्यांचेवर इलाज करण्यांत येऊन ते शिक्षेस पात्र व्हावेत. (३) ज्या प्रांतांत जाहिरात प्रसिद्ध होईल, तेथील रजिस्ट्रारनें खटला भरावा; त्या प्रांतांतच तो खटला चालेल. (४) अशी जाहिरात प्रसिद्ध झाली, कीं कंपनी, तिचे डायरेक्टर व अधिकारी ह्यांनीं कायद्याचा भंग केल्याचें गृहीत धरलें जाईल. ते जबाबदार नसल्याचें त्यांनीं सिद्ध करून कंपनीच्या त्या बाबत जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याचें नांव सांगितलें, तर त्याचेवर खटला भरला जाईल. (५) १०१ (२)मध्यें सांगितलेल्या चार बाबींचा स्वतंत्र तपशील प्रॉस्पेक्टसमध्यें दिला पाहिजे. त्यांचें अधिकृत भांडवलाशीं प्रमाणहि सांगितलें पाहिजे. किमान शेअर भांडवलाच्या विक्रीचा आंकडा दोघांपैकीं अधिक आहे, हेंहि नमूद केलें पाहिजे.

### ऑडिटरांस व्यापक अधिकार

कंपन्यांच्या ऑडिटमधील कांहीं दोष नाहींसे करण्यासाठी सरकारनें पुढील सूचना केल्या आहेत:—(१) ऑडिटरांची नेमणूक करणाऱ्या ठरावावर डायरेक्टर्स व मॅनेजिंग एजंटस ह्यांनीं मत देऊं नये (२) व्यवस्थेवर ऑडिटरनें ताशेरे ओढले आणि त्यानंतर त्याची फेर-नेमणूक न करता दुसऱ्यास ऑडिटर नेमण्यांत आलें तर मध्यवर्ती सरकार पहिल्या ऑडिटराच्या रिपोर्टाबाबत चौकशी करवील आणि जरूर तर नव्यानें नेमलेल्या ऑडिटरच्या जागीं पूर्वींचाच ऑडिटर नेमील. (३) निवृत्त होणाऱ्या ऑडिटरचे जोडीस नवा ऑडिटर नेमण्यांत आला, तर ती नवी नेमणूक समजण्यांत यावी. त्यास नेहमीप्रमाणें नोटीस आवश्यक असावी. (४) नव्या ऑडिटरच्या नेमणुकीची नोटीस देण्यांत आली आणि त्याबाबत निवृत्त होणाऱ्या ऑडिटरानें कांहीं म्हणणें मांडलें, तर तें भागीदारांकडे पाठविलें पाहिजे. (५) ऑडिटराची ताळेबंदावर व नफातोटा पत्रकावर सही होण्यापूर्वी तीं डायरेक्टर बोर्डानें संमत केलेलीं असलीं पाहिजेत. (६) बॅलन्सशीट न काढल्याबद्दल किंवा न पाठविल्याबद्दल कैदेची शिक्षा ठेवण्यांत यावी. (७) ऑडिटरनें स्वतंत्र रिपोर्ट केला असेल, तर तो भागीदारांकडे पाठविण्याची तरतूद असावी. (८) ऑडिटर त्याच्या कामासाठी माहिती व म्हणणें मागवितो, तेव्हां त्याच्या आवश्यकेबद्दल त्याचें मत अखेरचें ठरविलें जाईल. (९) इतर भागीदारांप्रमाणें ऑडिटरासहि साधारण सभेविषयीं नोटीसा वगैरे मिळाव्यात. त्याला सर्वसाधारण सभांस हजर रहातां यावें; हल्लीं फक्त वार्षिक सभांसच हजर राहण्याचा त्याला अधिकार आहे. त्याचा ऑडिटर ह्या नात्यानें संबंध येणाऱ्या सर्व प्रश्नांवर बोलण्याचा त्याला अधिकार असावा. (१०) वार्षिक सभेंत ऑडिटरची फेर-नेमणूक आपोआप व्हावी; तो फेर-नेमणुकीस अपात्र झाला असल्यास त्याचे जागीं दुसऱ्याची मुद्दाम नेमणूक केली असल्यास किंवा फेर-नेमणुकीस त्यानें आपली नाखुषी लेखी कळविली असल्यास, गोष्ट वेगळी. (११) ऑडिटर बदलणें झाल्यास भागीदारांना किमान २८ दिवसांची नोटीस पाहिजे. (१२) ऑडिटरच्या रिपोर्टांत "खरी आणि बिनचूक परिस्थिति" (ट्रू अँड करेक्ट व्ह्यू) "दिग्दर्शित असते, त्याऐवजी "खरी व योग्य" (ट्रू अँड फेअर) असे शब्द असावेत. (१३) खासगी कंपनीचें ऑडिटहि लायक ऑडिटरामार्फत व्हावें. (१४) कंपनीस ज्याचें देणें आहे, अशास आज तिचें ऑडिटर होता येत नाहीं. नित्याच्या व्यवहारांत निघणारें देणें त्यांत समाविष्ट केलें जाऊं नये. (१५) प्रत्येक कंपनीच्या शाखांचेंहि लायक ऑडिटर मार्फत ऑडिट झालें पाहिजे. वार्षिक ऑडिट करणारा ऑडिटर कंपनीच्या किमान १०% शाखांचें ऑडिट स्वतःच करण्याचें मागूं शकेल; त्याबद्दल त्यास कंपनीनें वेतन दिलें पाहिजे. (१६) ऑडिटरनें खर्चाच्या कांहीं बाबींस "बेकायदा, चुकीच्या अथवा भरमसाट" ह्या मुद्यांवर आक्षेप घेतला, तर त्यांची रक्कम डायरेक्टरांनीं, मॅनेजिंग एजटांनीं, कंपनींत भरली पाहिजे. व्यवस्थापकांस अर्थातच मध्यवर्ती सरकारकडे अपील करतां येईल.

—x—

### बेलापूर कंपनी लि.

३० सप्टेंबर, १९४९ अखेर संपलेल्या वर्षीं वरील कंपनीनें १,०३,०६,७३८ रुपयांची साखर विक्री केली. गेल्या वर्षीं १,२३,६५,३२७ रुपयांची साखर विकली होती. निव्वळ नफा ३१,४७,१०९ रु. झाला. त्यांतून १६ लक्ष रुपये कराच्या तरतुदीसाठी बाजूस काढले. प्रत्येक ५० रु. च्या शेअरला ८ रु. ६ आ. डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीच्या जमिनींतील अन्नधान्याच्या लागवडीमुळें जमिनीस विश्रांति न मिळाल्याकारणानें त्याचा पुढील उत्पादनावर परिणाम होण्याची भीति रिपोर्टांत व्यक्त करण्यांत आली आहे. कंपनी एस्टेटीवरील लाइट रेल्वेसाठी बराच खर्च केला आहे, त्यामुळें उसाची फॅक्टरीकडील वहातुक कार्यक्षम झाली आहे.

### पूर्व पंजाबांत टर्पेंटाइन तेलाचा कारखाना

पूर्व-पंजाब सरकारनें रेझिन आणि टर्पेंटाइन तेलाचा एक कारखाना काढण्याची परवानगी देण्याचें ठरविलें आहे.

### आदरातिथ्याची व्याख्या

"ज्यांची खाण्यापिण्याची व उठण्याबसण्याची स्वतंत्र चांगली सोय सहज होऊं शकते, अशांना आपल्या घरीं आग्रहानें उतरवून घेऊन खाऊं पिऊं घालणें व त्यांची रहाण्याची व्यवस्था करणें" म्हणजे आदरातिथ्य.

### ऑल इंडिया मॅ. ऑर्गनायझेशन

वरील संस्थेच्या मध्यवर्ती कमिटीची त्रैमासिक सभा हैद्राबाद येथें सर मोक्षगुंडम विश्वेश्वर अय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली. हैद्राबादच्या मिलिटरी गव्हर्नरनीं बैठकीचें उद्घाटन केलें.

### हुजूरपक्षाला पैसे कोठून मिळतात ?

ब्रिटनचे उपपराष्ट्रमंत्री मि. मॉरिसन ह्यांनीं एका भाषणांत हुजूरपक्षानें आपल्याला मिळणाऱ्या पैशांचा उगम दाखवावा असें आव्हान दिलें. मि. विन्स्टन चार्चिल ह्यांचे वडील लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल ह्यांनीं १८८३ सालीं असे उद्गार काढले होते कीं, ज्या पक्षाचा खर्च गुप्त असेल त्या पक्षांत नीतिबाह्य खर्च हा असावयाचाच. ह्या उद्गारांचा आधार मि. मॉरिसन ह्यांनीं घेतला आहे.

## ठिकठिकाणचा सहकारी दिन

### सोलापूर डि. सें. को. बँकेंत सहकारी दिन

ता. ५–११–४९ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेचे दिवाणखान्यांत सोलापूर येथील सुप्रसिद्ध कार्यकर्ते डॉ. कु. भि. अंत्रोळीकर, एम. एल. ए., यांचे अध्यक्षतेखालीं २७ वा सहकारी दिन मोठ्या थाटानें साजरा करणेंत आला. बँकेचे व्हाईस चेअरमन व डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह बोर्डाचे अध्यक्ष श्री. जी. डी. साठे, माढा, यांनीं नियोजित अध्यक्षांचें स्वागत करून आपल्या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा आढावा घेतला. अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत "सहकार" म्हणजे काय व आपल्या दैनंदिन जीवनांत "सहकार" कसा रुजलेला आहे याविषयीं महत्त्व पटवून देऊन भावी राजकारणाचा गाडा "सहकारा" शिवाय कसा अडून पडेल याविषयीं मार्मिक चर्चा करून "सहकारा" विषयींचें महत्त्व अत्यंत विशाल भूमिकेवरून, उदात्त विचारानें व सोप्या भाषेंत समजावून दिलें व सर्व श्रोतृवृंदास, सहकाराचें तत्त्व मानवीक जीवनांत कोणत्या मार्गानें जास्त झपाट्यानें फैलावलें जाईल त्याकडे विशेष लक्ष पुरवावें, अशी विनंती केली. श्री. आर. एम. पाटील, (वाळेकर) डायरेक्टर, यांनीं आभार मानले.

### पंढरपूर येथील सहकारी दिन

अखिल भारतीय सहकारी दिन, पंढरपूर येथें आमदार बाबूराव जोशी, वकील, यांचे अध्यक्षतेखाली थाटानें साजरा झाला. सहकारी खात्यांतील अधिकारी, बँक स्टाफ आणि गांवांतलि बरीच प्रतिष्ठित मंडळी हजर होती. अर्बन बँकेचे चेअरमन, श्री. उत्पात वकील, श्री. बी. वाय. देशमुख, बँक इन्स्पेक्टर, श्री. साळुंखे यांचीं समयोचित भाषणें झालीं. गेल्या सालीं यशस्वी झालेल्या सेक्रेटरींना अध्यक्षांचे हस्तें सर्टिफिकिटें देण्यांत आलीं. त्यानंतर ह्या जिल्ह्याचे को. ट्रे. इन्स्पेक्टर, श्री. देशमुख यांनीं सहकारी चळवळीसंबंधीं थोडक्यांत माहिती दिली. अध्यक्षांनीं समारोपादाखल केलेल्या भाषणांत सहकारी चळवळीचें महत्त्व सांगून ह्या चळवळीबद्दल सर्वांनीं आस्था बाळगावी असें सांगितलें. शेवटीं श्री. देशमुख यांनीं जमलेल्या मंडळींचे आभार मानलें. त्यानंतर फोटो व पानसुपारी होऊन हा छोटासा समारंभ आटोपला.

### सटाणें येथें सहकारी दिन

डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्डाचे विद्यमानें व बागलाण तालुक्यांतील सहकारी सोसायट्यांतर्फे सहकारी दिन सटाणें येथें शनिवार तारीख ५-११-४९ रोजीं दुपारीं ४ वाजतां सटाणा कोऑपरेटिव्ह पर्चेस सेल युनिअनच्या 'सर लल्लुभाई सामळदास हॉल' मध्यें एच. पी. टी. कॉलेजचे प्राध्यापक श्री. एस. जी. पुराणिक एम. ए. यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. श्री. दगा पाटील यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. गायन, संवाद व पोवाडे वगैरे कार्यक्रम करण्यांत आला. श्री. वामनराव पाटील (साकोरे) हे मुं. प्रॉ. को. बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर बिनविरोध निवडून आलेबद्दल श्री. लक्ष्मण धनजी पाटील (टेहरे) यांनीं सुचविल्यावरून सर्व मंडळीतर्फे त्यांचें अभिनंदन करण्यात आलें.

### सणसर येथें सहकारी दिन

सणसर विविध कार्यकारी सोसायटीतर्फे तारीख ३१-१०-४९ रोजीं सणसर येथें मे. पी. टी. वदक, व्हाईस चेअरमन, सेंट्रल को. बँक पुणें यांचे अध्यक्षतेखाली सहकारी दिन मोठ्या थाटानें साजरा करणेंत आला होता. श्री. ओगले, माजी चेअरमन, सें. को. बँक पुणें यांनीं सहकारी दिनाबाबत सर्वांगीण अशी माहिती दिली. सभेस सुमारे ३००।४०० सहकारी शेतकरी समाज हजर होता.

### श्रीलक्ष्मी सें. को. बँक, लि., फलटण मध्यें सहकारी दिन

फलटण तालुक्यांतील मध्यवर्ती बँक, सहकारी संस्था, खात्याचे स्थानिक अधिकारी आणि या चळवळींतील कार्यकर्ते यांच्या वतीनें फलटण येथें शनिवार दिनांक ५ नोव्हेंबर १९४९ या दिवशीं सायंकाळीं ५ वाजतां "सहकार दिना" निमित्त श्री. एल्. एस्. शिंदे, बी. ए., एल्एल बी., रेशनिंग ऑफिसर, फलटण यांच्या अध्यक्षतेखाली श्रीलक्ष्मी सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेच्या इमारतीमध्यें सभा झाली. अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सहकारी दिनाचें महत्त्व व अशा दिनांची उपयुक्तता सांगितली. त्यानंतर तेथील सुप्रसिद्ध वकील व फार वर्षे सहकारी चळवळींत कार्य करीत असलेले श्री. श्री. मा. दाणी यांचें सहकारी चळवळीचा प्रारंभ, तिची वाढती गरज, तिचें स्थान व तिची उपयुक्तता या विषयावर महत्त्वपूर्ण आणि उद्‌बोधक भाषण झालें. त्यांचे नंतर श्री. आ. रा. भोसले, श्री. एच. जी. मोहिते असि. डि. को. ऑफिसर फलटण, श्री. स. रा भोसले वकील, श्री. कौं. बा. अडसूळ व श्री. वि. शं. शिरपे चेअरमन श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि. यांचीं अतिशय कळकळीचीं आणि प्रसंगोचित भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षांचें समारोपाचें थोडक्यांत परंतु विचारप्रवर्तक असें भाषण झालें. त्यांनीं सर्व व्याख्यात्यांच्या मुद्यांचें तात्पर्य सांगून असे दिन साजरे करण्यापासूनचे फायदे विशद केले. अखेरीस श्री. श्री. ह. तळवलकर, व्यवस्थापक श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि. फलटण यांनीं अध्यक्ष, वक्ते व सर्व उपस्थित मंडळी यांचे यथोचित शब्दांत आभार मानले.

### महाराष्ट्र बँकेची हैद्राबाद शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची नवीन शाखा ५३८ सुलतान बाजार, हैद्राबाद (दक्षिण) येथें दि. २७ ऑक्टोबरला सुरू झाली. तिचें उद्‌घाटन हैद्राबाद सरकारचे अर्थ व व्यापार–उद्योग मंत्री श्री. सी. व्ही. एस. राव यांचे हस्तें झालें. उपस्थित मंडळीमध्यें राजा पन्नालाल पत्ती, श्री. एस. व्ही. नाईक, डॉ. व सौ. किर्लोस्कर, डॉ. बी. जी. रानडे, श्री. जार. जी. गांधी व हैद्राबाद आणि शिकंद्राबाद येथील व्यापारी मंडळी प्रामुख्यानें दिसत होती.

सुरवातीला बँकेचे चेअरमन श्री. धों. कृ. साठे यांचें भाषण झालें. त्यांनीं बँकेच्या प्रगतीचा धांवता आढावा घेतला. ते म्हणालेः–"आमची बँक हिंदुस्थानांतील एक प्रमुख अर्थशास्त्रज्ञ कै. प्रो. वा. गो. काळे यांचे मार्गदर्शनाखालीं सुरू झाली. तसेंच सध्यां रिझर्व्ह बँकेच्या मुंबई लोकल बोर्डावर असलेले श्री. वा. पुं. वर्दे यांच्या मार्गदर्शनाचाहि लाभ बँकेस या वर्षाच्या सुरवातीपर्यंत मिळाला. या १४ वर्षांच्या काळांत बँकेनें स्वतःची अशी एक कार्यपद्धति निर्माण केली. मध्यप्रांतांत नागपूर व कर्नाटकांत हुबळी या दोन दूरदूरच्या ठिकाणीं बँकेच्या शाखा आहेत. हैद्राबादचें मुंबईच्या बाजाराशीं दळणवळण व व्यापारी संबंध चांगले आहेत. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या हैद्राबादचे हिंदी संघ-राज्याशीं आतां घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले आहेत व दोघांचे हितसंबंधहि समान झाले आहेत."

श्री. राव यांनीं आपल्या भाषणांत बँकेचें कार्यक्षेत्र केवळ शहरी भागापुरतेंच मर्यादित ठेवूं नये असें सांगितलें. आतां हैद्राबाद येथें शाखा सुरू झाल्यावर संचालक मंडळ बँकेचें कार्यक्षेत्र खेडोपाडींहि पसरवील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली.

## औद्योगिक संरक्षणाच्या प्रश्नाचें बिकट स्वरूप

( भा. म. काळे )

औद्योगिक संरक्षणाचा प्रश्न यापुढें हिंदमध्यें जास्त गुंतागुंतीचा होत जाणार हें आतां स्पष्टपणें दिसूं लागलें आहे. १९४७ च्या पूर्वीप्रमाणें या प्रश्नाला आतां साधें स्वरूप राहिलेलें नाहीं. थोडें दिवसापूर्वी सायकलच्या धंद्याला संरक्षण देण्याचा प्रश्न उपस्थित झाला होता, त्या वेळीं कारखानदारांतर्फे परदेशाहून आयात होणाऱ्या सायकलींच्या संख्येवर मर्यादा पाहिजे असें सुचविण्यांत आलें होतें. देशी सायकलींच्या उत्पादनावर ठराविक प्रमाणांत मदत देण्यांत यावी अशी एक सूचना होती. केवळ संरक्षक जकात वाढवून आजच्या काळांत सायकल कारखानदारांचे हितसंबंध पूर्णपणें रक्षिले जाणार नाहींत हें त्यावेळच्या चर्चेवरून दिसून आलें. तशा प्रकारचीच कांहींशी परिस्थिति आतां मोटारच्या धंद्यांत निर्माण होत आहे. अद्याप पूर्णपणें मोटारी येथें तयार होत नाहींत. विशेषतः मोटारीचे सुटे भाग आणून त्यांचें जोडकाम करणें, व कांहीं भाग येथें बनविणें अशा स्वरूपाची येथील धंद्याची परिस्थिति आहे. या धंद्यांत तज्ज्ञांची आवश्यकता भासते ती निराळीच. अशा परिस्थितींत मोटारी तयार करणारा परदेशी भांडवलाचा एखादा नवीन कारखाना येथें निघाल्यास त्याची स्पर्धा देशांत चालू असलेल्या कारखान्यांना बाधक झाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण परदेशी कारखानदार तयार भाग येथें आणून त्यांचें जोडकाम करून मोटारी विकूं शकेल. कदाचित् येथील स्वस्त मजुरीचा फायदा घेऊन येथून मोटारी विक्रीसाठीहि जवळच्या देशांत निर्गत केल्या जाणें संभवनीय आहे.

तेव्हां, अशा अगदीं अर्धवट परिस्थितींत परदेशी भांडवलानें स्थापन होणाऱ्या कारखान्याला कोणत्या मर्यादेंत परवानगी द्यावी हा प्रश्न विचारपूर्वक सरकारला ठरवावा लागेल. मोटारच्या धंद्याला यापुढें कोणत्या स्वरूपांत संरक्षण दिलें पाहिजे याचा विचार टॅरिफ बोर्डाला सर्व परिस्थिति काळजीपूर्वक लक्षांत घेऊन करावा लागेल. केवळ संरक्षक जकातींनीं हा प्रश्न सुटणारा नाहीं. तर आयातीवर मर्यादा, मोटारींच्या अंतर्गत उत्पादनास शक्य तर मदत, आयात होणाऱ्या सुट्या भागांवर योग्य प्रमाणांत जकात, परदेशी भांडवलानें स्थापन होणाऱ्या एखाद्या नवीन कारखान्याला कोणत्या अटींवर परवानगी देणें, मोटारींचा जास्त प्रसार होण्यासाठीं पक्के रस्ते जास्त प्रमाणांत बांधणें, आयात होणाऱ्या कच्च्या मालावर जकात न ठेवणें, तज्ज्ञांचा व यंत्रज्ञांचा पुरवठा कसा होईल याबद्दल योजना आंखणें, इत्यादि अनेक गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील.

मद्रासच्या बाजूला परदेशी भांडवलानें साबणाचा नवीन कारखाना स्थापन होऊं नये अशी साबण कारखानदारांची मागणी आहे. कित्येक रासायनिक धंदे युद्ध परिस्थितींत वाढीस लागले. आतां युद्धानंतरच्या काळांत परदेशांतून रासायनिक द्रव्यांची आयात होऊं लागल्यामुळें अशा देशी कारखानदारांना संरक्षण कोणत्या स्वरूपांत द्यावें हाहि नवीन उपस्थित झालेला प्रश्न आहे. संरक्षणाचा बोजा सरतेशेवटीं जनतेवर पडतो; तेव्हां स्वस्त माल आपणाला मिळावा अशी जनतेची अपेक्षा असते. आजच्या परिस्थितींत परदेशी साखर आयात झाल्यास जनतेचा तात्काळ फायदा आहे. ऑस्ट्रेलियन टॅरिफ बोर्डानें १९४६ च्या अहवालांत म्हटल्याप्रमाणें संरक्षणाबरोबरच उच्च दर्जाची कार्यक्षमता राखण्याची जबाबदारी कारखानदारांवर येते, हें आपले कारखानदार जेव्हां ओळखतील, तो सुदिन !

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर

# धी बँक ऑफ सिटिझन्स लि.

स्थापना १९३७

मुख्य कचेरीः १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.

शाखाः बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर

बँक ऑफ सिटिझन्स लि.

बेळगांव.

### स्वस्तिक आयर्न वर्क्स लि., नाशिक

नाशिक येथील वरील कंपनीची मेसर्स वैशंपायन बंधू ह्यांच्या मॅनेजिंग एजन्सीखाली आतां पुनर्घटना झाली असून काम समाधानकारक चालू आहे, असें समजतें. प्रांताध्यक्ष श्री. भाऊसाहेब हिरे, ह्यांनीं कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचें अध्यक्षपद स्वीकारण्याचें मान्य केलें आहे, असेंहि कळतें. त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा फायदा कंपनीस मिळणार आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. नव्या मॅनेजिंग एजंटांनीं स्वतःचे बरेच पैसे कंपनींत गुंतविले आहेत, शेअर भांडवलांत वाढ झाली आहे, जुनी यंत्रसामुग्री दुरुस्त करण्यांत आली आहे, नवी यंत्रसामुग्री खरीदण्यांत येत आहे आणि नव्या नव्या उत्पादनाच्या कल्पना अंमलांत आणल्या जात आहेत. कंपनीच्या मालास मागणी वाढत आहे. अशा रीतीनें, कंपनीची प्रगति योग्य मार्गानें होऊं लागली आहे. आम्ही नव्या मॅनेजिंग एजटांस व कंपनीस सुयश चिंतितों.

---

### दि कागल सें. को. बँक लि.

अहवालाचे वर्षीं कागल बँकेच्या खेळत्या भांडवलांत ५० हजारांची वाढ होऊन तें २,८९,४६९ रु. झालें आहे. बँकेचें वसूल भांडवल ३६,५९७ रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ४०,८११ रुपयांचे आहेत. बँकेनें २,१७,२६९ रु. कर्जाऊ दिले आहेत. एकूण निव्वळ नफा ५,४०२ रु. झाला आहे. थकबाकीच्या वसुलीसाठीं शक्य ते प्रयत्न चालू आहेत.

---

### पुणें जिल्हा सहकारी खरेदी–विक्री संघ लि.

अहवालाचे वर्षी ह्या संघानें १,२६,९९,१०२ रुपयांची मालविक्री केली, त्यांत २,००,३१९ रु. व्यापारी नफा मिळाला. निव्वळ नफा ५७,६८३ रु. उरला. एकूण उलाढाल ६,८१,१८,२६५ रु. ची झाली. नफ्याचें प्रमाण ८५८६ पडलें आहे. संघानें २६,५३५ रु.स भवानी पेठेंत बांधलेली व मोकळी जागा खरेदी घेतली असून त्यावर इमारत व कोठारें ह्यांची योजना केली जांत आहे.

---

### दि सांगली स्टेट सें. को. बँक लि.

अहवालाचे वर्षी वरील बँकेच्या शेअर भांडवलांत १३,४६० रु. ची वाढ होऊन तें १,०६,७०० रु. झालें. निव्वळ नफा १२,०८४ रु. झाला. सुताचे व्यवहारांत बरीच रक्कम गुंतून राहिल्यामुळें चालू सालचा नफा गेल्या वर्षीपेक्षा थोडा कमी आहे.

---

### बार्शी सें. को. बँक लि.

बँकेनें आपल्या खेळत्या भांडवलापैकीं ८,५२,७३७ रु. (५४ टक्के) रक्कम कर्जाऊ दिलेली आहे. ही रक्कम आजपर्यंत गुंतविलेल्या रकमेपेक्षा सर्वांत मोठी असून थकबाकीचें प्रमाण एवढें अल्प (६%) गेल्या १०–१२ वर्षांत कधीही नव्हतें. अहवालाचे वर्षी बँकेस १८,०५५ रु. नफा झाला.

---

### दि कोल्हापूर मराठा को. बँक लि.

ह्या बँकेचें वसूल शेअर भांडवल आतां ७४,८०४ रु. झालें असून खेळतें भांडवल ४,३०,२८८ रु. झालें आहे. दिलेलीं कर्जें ३,४१,१२३ रुपयांचीं आहेत. चालू सालीं १०,६९७ रु. निव्वळ नफा झाला.

---


दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापना: १९२६.

मुख्य कचेरी:

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार: BANKOP फोन: २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा:

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.



## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

मुख्य कचेरी:–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा: डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

–: शाखा :–

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे

मॅनेजिंग डायरेक्टर

## कंपन्यांतील अफरातफर

**गुन्हेगारांत 'विश्वासार्ह' अधिकाऱ्यांचाच भरणा ज्यास्त**

मोठाल्या कंपन्यांतून पैशाची अफरातफर होते, ती बहुधा बिचाऱ्या कारकुनांकडून न होतां, अकाउंटंट, मॅनेजर, अशा विश्वासाच्या जागीं काम करणारांच्या हातूनच होते, असा अनुभव आहे. एका अमेरिकन मासिकांत तेथील कांहीं अनुभव दिले आहेत.

बँकेचा एक अधिकारी स्थानिक लोकांत अत्यंत विश्वासू म्हणून समजला जात होता आणि त्यामुळें तेथील मोठ्या शिक्षण-संस्थेच्या खजिनदाराचे जागीं त्याची नेमणूक करण्यांत आली. त्यानें एका रकमेनें बँकेंतून ७,५०,००० डॉलर "उचलले." बँकेच्या तपासणीचे वेळीं तो ही "घट" शिक्षणसंस्थेच्या नांवें टाकी व शिक्षण संस्थेच्या हिशेब तपासणीचे वेळीं बँकेवर त्याचा बोजा कांहीं दिवस टाकला जाई. बँक आणि शिक्षण संस्था ह्यांची तपासणी एकाच दिवशीं झाली तरच, किंवा बँकेची किंवा संस्थेची रोख शिल्लक ७,५०,००० डॉलरचे खालीं गेली तरच, ही उचल उघडकीला येणें शक्य व्हावयाचें. परंतु अफरातफर करणारे जी चूक नेहमीं करतात, तीच ह्या बँक अधिकाऱ्यानें केली; म्हणजे "उचललेला" पैसा हा स्वतःचा समजून तो उधळण्यास प्रारंभ केला. ही गोष्ट ऑडिटरचे नजरेस येऊन, बँकेंतून चोरी उघडकीस आली. अर्थात्, बेताच्या पगारावर चैनीनें राहिलें, तरी मालकांना शंका वाटतेच असें नाहीं. कित्येक वेळां, ह्या चैनीवर पांघरूण घालण्यासाठी अफरातफर करणारे लोक वारसा हक्कानें पैसा मिळाल्याची बतावणी करतात. बँकेच्या एका अकाउंटंटचें त्याच्या आत्याबाईकडून मोठी रक्कम मिळाल्याबद्दल त्याच्या मॅनेजरनें हार्दिक अभिनंदन केलें, परंतु ही आत्याबाई म्हणजे अखेर त्याची स्वतःची बँकच ठरली ! जबाबदारीच्या जागेवरील विश्वासार्ह अधिकारी चोरी कां करतात ? ह्याची कारणमीमांसा अशी:— (१) सट्टेबाजी व दारूबाजी. (२) आवाक्याबाहेर खर्च. (३) कर्जबाजारीपणा. (४) मिळकतीची गैर-व्यवस्था. (५) बाहेरख्यालीपणा. चोरीचे प्रमुख प्रकार असे:— (१) अस्तित्वांत नसलेल्या कंपन्यांच्या नांवें बिलाचे चेक फाडून खोट्या सह्यानें ते वटविणें. (२) "परत आलेल्या" मालाचे बदली चेक फाडून ते वटविणें; प्रत्यक्ष माल परत आलेलाच नसतो. (३) चालू किंमतीपेक्षा कमी किंमतीनें बिल करण्याबद्दल लाच घेणें. (४) चेक, व्हाउचर्स, इत्यादींची रक्कम वाढविणें. (५) रोखीचे व्यवहार न नोंदणें. (६) संशयित व बुडीत येणें वसूल करून त्याची वसुली न नोंदणें. (७) हजेऱ्या, कामाचा उठाव, इत्यादि खोटें नोंदणें. (८) जुन्या इन्व्हॉइसवरील रेव्हेन्यू स्टँप धुवून टाकून तीं पुनः पास करणें.

ह्यापैकी पहिला मार्ग—अस्तित्वांत नसलेल्या कंपन्यांच्या नांवें चेक देणें—अत्यंत लोकप्रिय आहे. स्वतःच्या कंपन्यांत चोरी करणारांत त्यांचे विश्वासू अधिकारीच मुख्यतः असल्यामुळें, त्यांची चोरी लवकर उघडकीस येऊंच शकत नाहीं.

---

**जपानच्या ग्रामोद्योगांचा अभ्यास**—जपानमधील लहान प्रमाणावर चालणारे ग्रामोद्योग कसे चालतात त्याचा अभ्यास करण्यासाठी मुंबई सरकारनें तीन जणांचें एक प्रतिनिधी मंडळ पाठविण्याचें ठरविलें आहे. ह्या मंडळांत सरकारचे दोन प्रतिनिधी आणि एक ग्रामोद्योग समितीचा सभासद असे आहेत.


**बेडेकर लोणचीं** वापरा

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

शेड्यूल्ड बँक

स्थापना १९३५

**बँकेच्या शाखा**

डेक्कन जिमखाना (पुणें) खडकी, मुंबई (फोर्ट, गिरगांव व दादर) नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण, कोल्हापूर व द. हैद्राबाद.

मुख्य कचेरी: लक्ष्मी रोड, पुणें २

चिं. वि. जोग, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.